# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचे आत्मनिर्भर भारताच्या उभारणीतील योगदान - एक अभ्यास

मार्गदर्शक
**डॉ. केशव वामनराव इंगोले**
प्राचार्य, राष्ट्रमाता बी. एड कॉलेज, लोहा जि. नांदेड

संशोधक
**वाघमारे अपर्णा शिवाजी**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे तब्बल ३४ वर्षानंतर तयार झालेले महत्वाचे धोरण आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची जागा आता २०२० चे नुकतेच जाहीर झालेले धोरण घेणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण म्हणजेच भारताला आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी प्रगतीच्या दिशेने टाकलेले हे महत्वपूर्ण पाऊल आहे. आता १०+२+३ या आकृतीबंधात बदल होवून ५+३+३+४ हा शिक्षणाचा आकृतिबंध तयार झाला आहे. यासाठी वयोगट ३-८, ८-११,११-१४,१४-१८ यामुळे ३-६ हा वयोगट आजपासून शाळेपासून दूर होता जगभरात हा वयोगट म्हणजे बालकांच्या जडणघडणीचा महत्वाचा काळ मानला जातो. या शैक्षणिक धोरणानुसार सर्वांना समान संधी निपक्षपातीपणा, दर्जा व परवडेल असे अधिकार सत्ता या आधारावर उभी केली आहे. व २०२० च्या शास्वत विकास कार्यक्रमाबरोबर सांगड घालण्यात आली आहे. महाविद्यालयातील शिक्षण जास्तीत जास्त समग्र बनवणे व २१ व्या शतकातील गरजेनुसार प्रज्ञावंत व्यक्ती अर्थात समाज घडविणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास करणे या नव्या शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश आहे. देशात शैक्षणिक विकास होत असला तरी ४०,००० कोलेज व ७०० पेक्षा जास्त विद्यापीठ आहेत. परंतु विद्यार्थी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या प्रमाणात उच्च शिक्षणाचे उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३% इतके आहे. तर नवीन शैक्षणिक धोरणात ५०% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट्ये ठरले आहे. मागील शैक्षणिक धोरणात अपूर्ण राहिलेल्या बाबींमध्ये सुधारणा करण्याकडे लक्ष देण्यात आले आहे. तसेच स्त्री-शिक्षण, व्यावसायिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

**विषमता :-**

गरीब व श्रीमंत यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न २०२० च्या शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे. खाजगी शाळा व सरकारी शाळा पूर्व प्राथमिक शाळांचा समावेश औपचारिक शिक्षणात केला आहे यामध्ये समानता आणण्यासाठी प्रयत्न केला गेला. तसेच खाजगी शाळा व संस्थाकडून भरमसाट फीस वसुलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या पालकांची होणारी लुट थांबविण्याचा या धोरणात प्रयत्न करण्यात आला आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण म्हणजेच बालवाडी ते उच्च शिक्षणापर्यंत नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

सन १९६६ मध्ये कोठारी आयोगाने GDP च्या 6% खर्च शिक्षणावर व्हावा अशी शिफारस केली होती पण त्याची अजूनपर्यंत अंमलबजावणी झाली नाही. या शैक्षणिक धोरणात शिक्षणावर 6% खर्च व्हावा असे सांगितले आहे. डॉ. कस्तुरीरंजन यांच्या अध्यक्षतेखाली नव्या शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला. हे आजपर्यंत चे तिसरे शैक्षणिक धोरण आहे. आतापर्यंत १९६८, १९८६ व यात सुधारणा करून १९९२ मध्ये याची अंमलबजावणी करण्यात आली होती. नवीन शैक्षणिक धोरण हे पुढील पिढीसाठी हितकारक ठरणारं आहे. आता स्मरणशक्तीवर परीक्षा पद्धती बंध होऊन प्रात्यक्षिक शिकण्यावर भर दिला जाणार आहे. शिक्षण हे यापुढे मनोरंजनातून दिले जाणार आहे. हे शैक्षणिक धोरण शैक्षणिक समस्या सोडवण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी याची कितपत अंमलबजावणी होईल हे निश्चित सांगता येत नाही. के कस्तुरीरंजन समितीच्या अहवालासोबतच्या पत्रात अहवालाची पाच मूल्यांशी बांधिलकी असल्याचा विश्वास माननीय अध्यक्षांनी व्यक्त केला ती ५ मुल्ये म्हणजे १) उपलब्धता २) समता ३) गुणवत्ता ४) खरेदीयोग्य दरात उपलब्धता ५) उत्तरदायित्व हे आहेत.

अध्यापनाचा दर्जा सुधारावा म्हणून चार वर्षाची पदवी व इतर पात्रता परीक्षा सुचवण्यात आले आहेत. शिक्षकांचा प्रशासकीय भार कमी व्हावा म्हणून इतर स्वयंसेवकांची मदत घेतली जाणार आहे असे नमूद केले आहे. काही बाबी या आवर्जून नमूद कराव्यास्या वाटतात कि १) देश आणि राज्य यांचा मेळ घालणारी पुस्तके लिहणे खरोखरच कठीण कार्य आहे. कारण अजूनही राज्याराज्यातील भेद ठळक आहेत. २) शिक्षकांचा दर्जा, शिक्षण व प्रेरणा या दोन्ही बाजू असूनही एखादा शिक्षक योग्य प्रकारे अध्यापन करत नसेल असे होऊ शकते. ३) Light But Tight- हलका परंतु मजबूत हि खाजगी संस्थावर अंकुश ठेवण्यासाठीची कल्पना जरी चांगली असली तरी हलके का हे काळत नाही आज काही ठिकाणी काही संस्था अशा पाहायला मिळतात, कि त्या संस्थेत नोकरी करणारे त्याच संस्थाचालकांचे नातेवाईक तेथे भरलेले असतात यामुळे त्यांची गुणवत्ता न तपासता त्यांना अध्यापनाची संधी दिल्याने शिक्षणाची गुणवत्ता हि ढासळत आहे, त्यासाठी प्रशिक्षित व गुणवंत अध्यापकाची शासनामार्फत भरती करणे गरजेचे आहे. ४) कृषीप्रधान :- भारतासारख्या कृषी प्रधान देशात शेतकऱ्यांची बाजू मांडणारे खूपच कमी लोक आहेत. आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात होतांना दिसून येत आहेत. के. कस्तुरीरंगन यांनी कृषी व व्यावसायिक शिक्षणाची थोडक्यात बदल करून माहिती दिली. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हे शैक्षणिक धोरण प्रगतीच्या दिशेने महत्वाचे राहणार आहे. हे धोरण आता अस्तित्वात असलेल्या नियामक संस्थाना उदा. NTA, NCERT, SCERT इत्यादींना सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. शिवाय केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्यांतील संबधित मंत्री यांना या धोरणाच्या अंमलबजावणीचे काम पूर्ण करण्याची महत्वाची जबाबदारी दिली आहे आता असलेली CABE म्हणजे केंद्रीय शिक्षण सल्लागार संस्थेच्या ऐवजी आता राष्ट्रीय शिक्षण संस्था असावी असे धोरण सांगते. केंद्रीय ऐवजी राष्ट्रीय शब्द योग्य वाटतो. शैक्षणिक धोरणाविषयीची गती आणि क्रियाशीलता पहिल्यांदाच दिसून येते. या धोरणाची अंमलबजावणी २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने होणार आहे परंतु या शैक्षणिक धोरणाची पूर्णपणे अंमलबजावणी होईल का असा प्रश्न उभा राहतो. दुर्गम भागांचे व दुर्बल घटकांचे सबलीकरण व्हावे आणि त्याचबरोबर उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारावा ही अपेक्षा.

**विद्यार्थ्यांना आर्थिक मदत** :- SC,ST,OBC विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन दिले जाईल शिष्यवृत्ती पोर्टल चा विस्तार करून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल.

**मुक्त शिक्षण** :- शिक्षणाच्या प्रवाहात विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी मुक्त व दुरस्त शिक्षणाचा विस्तार केला जाईल. Online course, Digital Library, संशोधनासाठी खर्च केला जाईल.

**डिजिटल शिक्षण** :- सध्या कोरोना या महामारीचा झालेला प्रसार विचारात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये डिजिटल शिक्षणास चालना देण्यासाठी दर्जेदार शिक्षणासाठी पर्याय शोधले मनुष्यबळ विकास मंत्रालयामध्ये Digital Classroom, डिजिटल साहित्य व डिजिटल विभाग तयार केले आहेत.

**भारतीय भाषांचा प्रचार :-**

भारतीय भाषांचा प्रचार व्हावा यासाठी NEP-2020 च्या शिफारशीनुसार राष्ट्रीय भाषांतर आणि भाष्य संस्था व National Institute Of Pali आणि प्राकृत व पार्शियन भाषेसाठी संस्था स्थापण्याचा सल्ला दिला आहे. एवढेच नव्हे तर उच्च शिक्षण संस्थामध्ये मातृभाषेचा उपयोग अध्यापनासाठी केला जावा असे नमूद केले आहे.

१००% प्रौढ साक्षरता करण्याचे या नवीन धोरणाचे उद्दिष्ट्ये आहे. तसेच यामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० ही शिक्षण क्षेत्रातील नवीन पहाट आहे. प्रौढ शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, भाषिक शिक्षण, डिजिटल शिक्षण, तंत्र आधारित शिक्षण आणि महत्वाचे म्हणजे मातृभाषेतून शिक्षण यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवी पहाट होऊन देश एक विकसित राष्ट्र होईल अशी अशा वाटते. २०२० च्या या नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण घेत असताना आता स्मरणशक्ती अर्थात रट्टा मारा आणि पास व्हा हि पद्धती बंद होऊन प्रात्यक्षिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. यावरून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार आठवतात ते म्हणतात, कि " शिक्षक ते नाहीत जे विद्यार्थ्यांच्या डोक्यात तथ्य जबरदस्ती थोपतात, शिक्षक तर ते असतात जे विद्यार्थ्यांना येत्या काळातील आव्हानासाठी तयार करतात." शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर खरे शिक्षक तयार होतील अशी अशा वाटते. आणि या शैक्षणिक धोरणात

बालकांच्या शिक्षणाला महत्व देण्यात आले पूर्व प्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणात समावेश करण्यात आला. आजचे बालक हे उद्याचे सुजान नागरिक असतात. म्हणून बालकांच्या बालवयातील जडण घडणीला महत्व प्राप्त झाले यावरून कवी कुसुमाग्रज यांच्या कवितेच्या ओळी आठवतात.

*"नव्या दिशेचे नव्या उषेचे गीत सूर हे गाती ,*
*या मंगल देशाचे आहे भविष्य त्यांच्या हाती"*

नवीन शैक्षणिक धोरण २०२० या शैक्षणिक धोरणात भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल उचललेले दिसत आहे . नवीन शैक्षणिक अहवाल जरी प्रगतीपथावर जाणारा दिसत असला तरी या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०३० पर्यंत उद्धीष्ट्य साध्य करणे हे फार मोठे आव्हान आहे. जगभरात भारताची संस्कृती हि प्राचीन संस्कृती म्हणून ओळखली जाते. आपण भारताच्या प्राचीन संस्कृतीचा विचार केला तर असे आढळते की कोणत्याही कठीण परिस्थितीत भारतीय जनता आत्मनिर्भर होती. आत्मनिर्भर या शब्दाचा अर्थ असा आहे की स्वत:च्या पायावर उभे राहणे, स्वकष्टाने स्वत:चा विकास करणे होय. याचा देश उभारणीसाठी उपयोग होईल. "आत्मनिर्भर भारत अभियान" हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबवले आहे. शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या धोरणाची अंमलबजावणी केली असता औद्योगिक विकास होईल याचा परिणाम म्हणून बेरोजगारी कमी होईल आणि जागतिक बाजारपेठेतील भारताची निर्यात वाढेल. बेरोजागारीबरोबरच दारिद्र्य सुद्धा दूर होईल त्या बरोबरच देशाची अर्थव्यवस्था बळकट होईल. भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर असेल.

**निष्कर्ष :-**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अनेक स्वागतार्ह निर्णय घेण्यात आले त्या मध्ये शिक्षणासंदर्भात KG ते PG चा विचार करण्यात आला त्यासंदर्भात योग्य निर्णय घेण्यात आले. त्याबरोबरच विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना भाषा हा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मातृभाषेतून शिक्षण व व्यावसायिक शिक्षणास महत्व देण्यात आले. परंतु या धोरणांची अंमलबजावणी महत्वाची आहे. धोरण जाहीर झाल्यापासून कोरोना महामारी चालू आहे त्यामळे सरकारने आरोग्यावरील खर्च वाढवला हे योग्यच आहे. परंतु सरकारने भविष्यात शिक्षणावरील खर्च वाढवावा. नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे आशादायी आहे त्याची अंमलबजावणी एक आव्हान आहे. शेवटी कवी वी. भा नेमाडे यांच्या कवितेच्या ओळी

*" विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती,*
*नसा नसातून जोश उसळतो नवं आशा चित्ती,*
*अनु रेणुतुनी शब्द प्रगटती.....चला..चला पुढती."*

**शिफारशी :-**

1. भारत सरकारने उच्च शिक्षणावरील खर्च वाढवावा.
2. गुणवत्ता पूर्ण शिक्षक मिळावे यासाठी शासनाने शिक्षक भरती ही पारदर्शकपणे राबवावी. जेणेकरून जे खरोखरच अध्यापनासाठी पात्र आहेत अशा गुणवंत शिक्षकांची निवड करावी.
3. ३)भारत सरकारने संशोधक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी.

**संदर्भ**

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020,शिक्षण मंत्रालय,भारत सरकार